तहसिलदार कारंजा(घा)यांचे कार्यालय तहसिल कारंजा (घा)

दुरध्वनी क्रमांक-07156-245844 Email ID-rokaranja@gmail.com

पत्र क्रमांक/कलि/प्रस्तु-1/कावि-345/2020 दिनांक-08/06/2020

प्रति,

दुय्यम निबंधक
कारंजा(घा)

विषय : मौजा दाभा येथील शेत सर्वे क्रमांक 141 मध्ये अकृषक आदेशानुसार आवश्यक कार्यवाही करण्याबाबत.

संदर्भ : 1. या कार्यालयाचे रामाक्र 05/एनएपी-34/ 2018-19 आदेश पारित दिनांक-16/03/2020
2. अर्जदार श्री राजेश भैयालाल साहू यांचा अर्ज दिनांक 04/05/2020
3. तलाठी दाभा यांचा स्थळचौकशी अहवाल दिनांक- 19/05/2020
4. सचिव ग्रामपंचायत भालेवाडी यांचा चौकशी अहवाल दिनांक- 02/06/2020

उपरोक्त संदर्भीय विषयाचे अनुषंगाने कळविण्यात येते की, संदर्भ क्रमांक 1 अन्वये या कार्यालयातर्फे अकृषक आदेश पारित करण्यात आला आहे. सदर आदेशानुसार अट क्रमांक 26 आणि 27 द्वारे निवासी क्षेत्राच्या 10% जागा म्हणजेच प्लॉट क्रमांक 82 ते 90 हे भूखंड अंतिम विकास कामाच्या अधीन राहून राखीव ठेवण्यात आले होते. तथापि अर्जदार यांनी संदर्भ क्रमांक 2 अन्वये या कार्यालयास अर्ज सादर करून प्रस्तुत अकृषक ले आऊट मध्ये विकास कामे पूर्ण केली असून विकास कामे पूर्ण झाल्यामुळे या कार्यालयातर्फे उपरोक्त ले आऊट मधील राखीव दर्शविण्यात आलेले भूखंड क्रमांक 82 ते 90 मुक्त करण्याबाबत विनंती केली आहे.

यासंबंधाने तलाठी दाभा आणि सचिव ग्रामपंचायत भालेवाडी यांनी संदर्भ क्रमांक 3 आणि 4 अन्वये प्रत्यक्ष जागेचा चौकशी अहवाल सादर करून उक्त अकृषक लेआउट मध्ये अर्जदार यांनी आवश्यक मुलभूत सुविधांची पूर्तता केल्याचे अहवाल सादर केला आहे सबब या कार्यालयातर्फे पारित अकृषक आदेशामध्ये नमूद अट क्रमांक 26 आणि 27 द्वारे प्लॉट क्रमांक 82 ते 90 यावरील निर्बंध काढण्यात येवून सदर प्लॉट मुक्त करण्यात येत आहे.

करिता आदेशामध्ये नमूद अट क्रमांक 26 आणि 27 मधील निर्बंध मुक्त करून या कार्यालयातर्फे उक्त प्लॉटचे व्यवहार करण्यास या कार्यालयाची काहीही हरकत नाही.

तहसिलदार कारंजा (घा)

प्रतिलिपी- अर्जदार श्री राजेश भैय्यालाल साहू राह भामटीपुरा वर्धा यांना माहितीस रवाना.

तहसिलदार कारंजा (घा)